# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४

दूरध्वनी क्र.:-०२०- २६१२३०६६/६७वेबसाइड:-mscepune.inई-मेल :-mscepune@gmail.com

जा.क्र./मरापप/भांडार/2025/द.सू./ 6358

दिनांक:- 30 /12/2025

प्रति,

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

विषय:- चहा, नाश्ता व जेवण यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील विविध परीक्षांच्या परीक्षा पूर्व व परीक्षोत्तर कामकाजासाठी विषय तज्ञ, केंद्रसंचालक, शिक्षक तसेच कार्यशाळेसाठी निमंत्रित सदस्य इ यांना परिषदेमार्फत आवश्यकतेनुसार चहा, नाश्ता व जेवण यांची व्यवस्था संबंधित शाखेमार्फत सभा आयोजनावेळी करण्यात येते. परिषदेतील निमंत्रितांना चहा,नाश्ता व जेवण पुरविणेसाठी आपली संस्था सेवा देण्यास इच्छुक असल्यास तक्त्यात नमूद केलेल्या तपशीलानुसार (चहा,नाश्ता व जेवण प्रतिनग दर) त्याचे वर्गीकरणानुसार दर प्रती नग याप्रमाणे परिषदेस बंद पाकिटात खालील नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून दरपत्रक मागविण्यात येत आहे. बंद पाकिटावर चहा, नाश्ता व जेवण यासाठी दरपत्रके असा स्पष्ट उल्लेख करावा. सदरच बंद पाकिटे दिनांक ~~/12/2025~~ 6/01/2026 रोजी सायं. 5.00 पर्यंत परिषदेकडे हस्तपोच आणून द्यावीत.

अटी व शर्ती

1. सहभागी संस्थेने सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेला अन्न् परवाना, प्रोपरायटर यांचे आधार व पॅन यांच्या छायांकित प्रती दरपत्रकासोबत स्वतंत्र लखोटयात (तांत्रिकबाबीचा व दराचा लिफाफा) परिषदेस सादर कराव्यात.
2. परिषदेतील शाखेच्या /विभागांच्या मागणी आदेशानुसार ताजे/ स्वच्छ, चांगले/ मानक देणे बंधनकारक आहे. तसेच चहा, नाश्ता व जेवण करिता लागणारे रिकामे ताट किंवा ग्लास (भांडी) इत्यादी आपण स्वत: घेऊन येणे बंधनकारक राहिल.
3. तसेच आपणाकडून अन्न् पुरविण्यासाठी ज्या परिसराचा वापर करण्यात आला आहे तो परिसर स्वच्छ करुन देणे आपणावर बंधनकारक राहिल.
4. सहभागी संस्थेला कार्यादेश देण्यापूर्वी पुरवठा करणार असलेल्या संस्थेस खादय पदार्थांचा दर्जा व चव याबाबत खात्री करून घेऊनच संस्था निश्चिती करणेसंबंधी कार्यादेश दिला जाईल.
5. आपणाकडून पुरविण्यात आलेल्या एखादया निकृष्ठ दर्जाच्या पदार्थामुळे अन्न् सेवन केल्याने, काही त्रास किंवा अन्नातून विषबाधा झाल्यास आपल्या संस्थेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
6. परिषदेला सुट्टीच्या दिवशी किंवा उशिराने एखादया पदार्थासाठी किंवा थाळीसाठी सेवा पुरविण्याच्या एक दिवस आगोदर मागणी असल्यास तसा आदेश दिल्यास सेवा देण्याची व्यवस्था करावी.

7. परिषदेत देण्यात येणाऱ्या सेवा हया वेळेच्या बंधनासह आपण स्वत: किंवा आपल्या संस्थेच्या प्रतिनिधीकडून (कामगारांकडून) पुरविण्यात याव्यात. अन्न् पदार्थ ज्या स्वच्छ ताटामध्ये दिले जाते, ती पुरविण्याची वा परत नेण्याची जबाबदारी आपल्या संस्थेची राहिल.
8. आपत्कालीन व्यवस्थेत अन्नपदार्थ पुरविण्यासाठी नाश्ता किंवा जेवण आपल्या संस्थेकडून सेवा पुरविणे शक्य नसल्यास आपल्या संस्थेने पर्यायी व्यवस्था करावी. तसे परिषदेस लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक आहे.
9. अन्नपदार्थ तयार करतेवेळी वापरला जाणारा कच्चा माल, तेल किंवा तूप ISI मार्क असलेले विकत घेणे आपणास बंधनकारक राहिल. तसे पदार्थ वापरले गेल्यास त्याच्या परिणामाची संपूर्ण जबाबदारी आपली राहील तसेच भेसळयुक्त पदार्थ वापरण्यात येवू नये.
10. परिषदेने सदर मागवित असलेले दरपत्रक कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.
11. सदर दरपत्रके मागविलेल्या व प्राप्त् होणाऱ्या सबबीवर परिषद अभिप्राय देणेस बांधिल राहणार नाही.
12. सदर कामासाठी न्यूनतम दर प्राप्त् होणाऱ्या संस्थेस रु. 500 च्या स्टँप पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.
13. परिषदेच्या मागणीनुसार सेवा पुरवठा केल्यावर देयकाची छाननी झाल्यानंतर देयक अदा केले जाईल. त्याकरिता कोणत्याही प्रकारे आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

चहा, नाश्ता व जेवण यासाठी आपल्या दरपत्रकानुसार मान्य दर खालीलप्रमाणे नमूद आहे.

| अ.क्र. | वर्णन | प्रति नग तपशील | दर (सर्व करासहित) |
|---|---|---|---|
| 1 | चहा | | |
| 2 | नाश्ता प्रति व्यक्ती प्लेट दर (पोहे, उपीट, इडली इत्यादी.) | | |
| 3 | जेवण - प्रति व्यक्ती प्लेट दर (स्वीटसह) अमर्यादित जेवण | | |

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - 4